यंत्र अभियांत्रिकी विभाग

**विभागीय परिपत्रक : (अत्यंत महत्वाचे)**

संदर्भ :- मराटांशेम/का.४०/परिक्षाविभाग.f३/२०२५/८०
दिनांक :- ०३ मार्च २०२५

सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, K-Scheme अभ्यासक्रमातील पाचव्या सत्रातील Internship (12 week) विषयकोड- ३१५००४, जे विद्यार्थी चौथे सत्र K-Scheme मध्ये पुर्ण करतील, अशा सर्व विद्यार्थ्यांना पाचव्या सत्राच्या अभ्यासक्रमानुसार १२ आठवड्याचे औद्योगिक प्रशिक्षण समाधानकारकरित्या पुर्ण करणे अनिवार्य आहे.

* तसेच ज्या विद्यार्थ्यांनी चौथे सत्र A/C/E/G/I Scheme मध्ये पुर्ण केले. परंतु पाचव्या सत्रासाठी ज्या विद्यार्थ्यांना K-Scheme मध्ये प्रवेश घ्यायचा आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांना <u>१२ आठवड्याचे</u> प्रशिक्षण पुर्ण करणे अनिवार्य आहे.

उपरोक्त विद्यार्थ्यांनी K-Scheme मधील Internship समाधानकारकरित्या पुर्ण केली नसल्यास, अशा विद्यार्थ्यांना मंडळाच्या Examination Regulations (2018-19) नियम RG-6(B) मधील तरतुदीनुसार रोखविण्यात (Detain करण्यात) येईल.

सर्व संबंधीत विद्यार्थ्यांनी यासोबत जोडलेल्या मंडळाच्या परिपत्रकाचे काळजीपुर्वक वाचन करावे. संबंधीत अडचण असल्यास अथवा प्रशिक्षणास नाव देण्यासाठी यंत्र विभागात प्राध्यापक श्री. ए.पी. चव्हाण यांच्याशी संपर्क करावा.

दिलेल्या सुचनांचे पालन न केल्यास होणाऱ्या शैक्षणिक नुकसानास विद्यार्थी स्वतः जबाबदार राहतील.

विभाग प्रमुख
यंत्र अभियांत्रिकी विभाग
शासकीय तंत्रनिकेतन मुर्तिजापूर

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत,४ था मजला,४९,खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२१००/११०

संकेतस्थळ : www.msbte.ac.in ई-मेल : director@msbte.ac.in


जा. क्र. मरातंशिमं/का-४०/परिक्षाविभाग-F३/२०२५/८० दिनांक – 03 MAR 2025

**महत्त्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

'K' Scheme पदविका अभ्यासक्रम राबविणा-या

मंडळाशी संलग्नित सर्व संस्था

विषय: 'K' Scheme अभ्यासक्रमातील पाचव्या सत्रातील Internship (12 weeks) विषयकोड - ३१५००४ या विषयाबाबत ...

संदर्भ: १) मंडळाचे महत्त्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-५१/Kscheme/२०२५/१२५९, दि. २७/०२/२०२५

२) AE/AI/AN/AO/BD/CE/CH/CM/CO/CR/CS/CW/DE/DS/EE/EJ/EK/EP/ET/EX/ HA/IE/IF/IH/LE/ME/MK/PG/SE/TE या अभ्यासक्रमातील पाचव्या सत्रातील Internship (12 weeks) (विषयकोड – ३१५००४) या विषयाचा पाठ्यक्रम

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत AICTE मान्यता प्राप्त पदविका अभ्यासक्रमाच्या K-Scheme अंतर्गत पाचव्या सत्राची स्कीम व पाठ्यक्रम मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. याबाबत संदर्भ क्र. १ मधील परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. तसेच सदर परिपत्रकान्वये सर्व प्राचार्यांना पाचव्या सत्रातील ज्या अभ्यासक्रमांना १२ आठवड्यांचा Internship हा विषय आहे, त्या विषयाच्या पाठ्यक्रमात नमूद सूचीनुसार चालू (चतुर्थ) सत्रात काही पूर्व तयारी करणे अपेक्षित असून हि बाब संस्थेतील विभागप्रमुख यांच्या निदर्शनास आणावे, असे ही सूचित केले आहे.

तरी या परिपत्रकाद्वारे Inplant Training (12 weeks) (विषयकोड – ३१५००४) या विषयाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

१) जे विद्यार्थी चौथे सत्र K Scheme मध्ये पूर्ण करतील, अशा विद्यार्थ्यांनी K Scheme मधील पाचव्या सत्राच्या अभ्यासक्रमानुसार १२ आठवड्याचे Internship समाधानकारकरित्या पूर्ण करणे अनिवार्य राहील. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी A/C/E/G/I या जुन्या स्किम मध्ये १ ते ४ सत्र पूर्ण केले आहे व K Scheme मधील पाचव्या सत्राकरीता पात्र होत असतील, अशा सर्व विद्यार्थ्यांनी सुद्धा K Scheme मधील पाचव्या सत्रातील १२ आठवड्याचे Internship पूर्ण करणे अनिवार्य राहील.

२) उपरोक्त विद्यार्थ्यांनी K Scheme मधील Internship समाधानकारकरित्या पूर्ण केले नसल्यास, अशा विद्यार्थ्यांना मंडळाच्या Examination Regulations (2018-19) नियम RG-6(B) मधील तरतुदीनुसार थोपविण्यात (Detain करण्यात) यावे.

तरी या परिपत्रकाद्वारे आपणांस सूचित करण्यात येते की, उपरोक्त सर्व विद्यार्थ्यांनी K Scheme मधील पाचव्या सत्रातील १२ आठवड्याचे Internship (विषयकोड – ३१५००४) या विषयाच्या पाठ्यक्रमात नमूद मानकाप्रमाणे पूर्ण करणे आवश्यक आहे. Internship पूर्ण न केल्यास होणा-या संभाव्य शैक्षणिक नुकसानीस विद्यार्थी जबाबदार राहील, याची संस्थाप्रमुखांनी विद्यार्थ्यांना जाणीव करून द्यावी. तसेच वरील सुचनांचे पालन करण्यात यावे व त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांस अवगत करावे.

(डॉ. प्रमोद नाईक)

संचालक

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत:

१) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव

२) उपसचिव, विभागीय कार्यालय – मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजी नगर यांना आवश्यक कार्यवाहीकरीता

Scanned with OKEN Scanner